# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ
## (पूर्वीचे पुणे विद्यापीठ)

परिपत्रक क्र. १८२ /२०२३

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाशी संलग्नित महाविद्यालये/मान्यताप्राप्त परिसंस्थामध्ये शैक्षणिक वर्ष २०२३—२४ करीता विहित पध्दतीचा अवलंब करून विद्यापीठ निवड समिती/स्थानिक निवड समितीद्वारे निवड करण्यात आलेल्या अध्यापकांच्या निवड समितीचे अहवाल व त्या अनुषंगाने इतर सर्व आवश्यक ती कागदपत्रे निवड समिती झालेल्या दिवशी (on the same day) निवड समिती अहवालासह ऑनलाईन पध्दतीने अपलोड करून, त्याची प्रिंट आऊट घेऊन, सर्व कागदपत्रे मूळ निवड समिती अहवालासोबत दहा दिवसाच्या आत शैक्षणिक विभाग, मान्यता कक्षाकडे सादर करण्याबाबत परिपत्रक क्र. १०२/२०२३, जा. क्र. सीसीओ/१६२३, दि. ०६ जून, २०२३ अन्वये कळविण्यात आलेले आहे.

महाराष्ट्र शासन, उच्च व तंत्र शिक्षण विभाग यांनी शासन निर्णय क्र. संकीर्ण—२०१९/ प्र. क्र. ९४/१९/विशि—१, दि. ११ एप्रिल, २०२२ रोजी निर्गमित केलेल्या शासन निर्णयामध्ये महाराष्ट्र शैक्षणिक संस्था (अध्यापक संवर्गातील आरक्षण) अधिनियम, २०२१ नुसार राज्यातील अकृषि विद्यापीठे व संलग्नित महाविद्यालये/संस्थांमधील शिक्षकीय पदांच्या संवर्गनिहाय आरक्षण धोरणाच्या अंमलबजावणीबाबत आदेश निर्गमित करण्यात आलेले आहेत. त्यानुसार विविध महाविद्यालयांकडून शासन निर्णयाची अंमलबजावणी करण्यात येत असून त्याप्रमाणे महाविद्यालयामध्ये रिक्त असलेली पदे भरणेकामी निवड समितीचे आयोजन केले जाते. तथापि, सर्व विषयांच्या मुलाखती पूर्ण झाल्यानंतर प्रत्येक विषयाची विषयनिहाय गुणवत्ता यादी (Merit List) तयार करण्यासाठी वेळ लागत असल्याने विद्यापीठाने यापूर्वी निर्गमित केलेले परिपत्रक क्र. १०२/२०२३ नुसार महाविद्यालयास निवड समितीचा अहवाल, निवड समिती झालेल्या दिवशी (on the same day) अपलोड करण्यास अडचणी येत असल्याचे निदर्शनास आलेले आहे.

या परिपत्रकाद्वारे सर्व संबंधितांना कळविण्यात येते की, शैक्षणिक वर्ष २०२३—२४ करीता विहित पध्दतीचा अवलंब करून विद्यापीठ निवड समिती/स्थानिक निवड समितीद्वारे निवड करण्यात आलेल्या अध्यापकांचा निवड समिती अहवाल, निवड समितीचे कामकाज पूर्ण झालेल्या दिवसापासून **पुढील ४८ तासात ऑनलाईन पध्दतीने अपलोड करण्यात यावा.** तसेच निवड समिती अहवालाची मूळ प्रत (Hard Copy) निवड समितीचे कामकाज पूर्ण झाल्यापासून ७२ तासांच्या आत शैक्षणिक विभाग, मान्यता कक्षाकडे सादर करण्यात यावी. त्याचप्रमाणे निवड करण्यात आलेल्या सर्व उमेदवारांची कागदपत्रे लवकरात लवकर अपलोड करून त्यांचा शिक्षक मान्यतेचा प्रस्ताव दहा दिवसांच्या आत शैक्षणिक विभाग, शिक्षक मान्यता कक्षाकडे सादर करण्यात यावा.

गणेशखिंड, पुणे — ४११ ००७. )
जावक क्र. सीसीओ/ २५०७ )
दि. २१/०८/2023 )

Rasbe 11/8/2023
(डॉ. मुंजाजी रासवे)
उपकुलसचिव
शैक्षणिक विभाग (शिक्षक मान्यता कक्ष)

प्रत :
१) मा. प्राचार्य, सर्व संलग्न महाविद्यालये
२) मा. संचालक, सर्व मान्यता प्राप्त परिसंस्था